**पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template**

| विभागाचे नाव | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पुणे |
|---|---|

| अ. क्र. | प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping) | बाब | | माहिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| PC१ | प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and | प्रक्रियेचे **नाव** | | सामान्य प्रशासन विभाग कडील संगणक व इतर संगणकीय साहित्य खरेदी कामकाज | |
| PC२ | | कार्यासन **संकेतांक** (उदा. आस्था1, लेखा 4) | | आस्थापना - २४ | |
| PP१ | प्रक्रिया प्रस्तावित करणे (process proposal) | प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी (Maker)- **पदनाम** | | वरिष्ठ सहाय्यक | |
| PP२ | | संदर्भीय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके,पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावेत. | | १).महाराष्ट्र शासन - उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील खरेदी विषयक मार्गदर्शक परिपत्रक क्रमांक. भांखसे / १०८८ / २५१२ / उदयोग ६ /२०१६ , दिनांक. ०१ डिसेंबर २०१६ नुसार खरेदी प्रक्रीया राबविणे.<br><br>**महाराष्ट्र शासनाकडील उद्योग उर्जाव कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण /२०१६/प्र. क्र. २१५/ उदयोग ४, दिनांक. २४ऑगस्ट २०१७**<br>१)केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेस मान्यता देण्यात आली.<br>२) खरेदीदार विभागास (GeM) पोर्टलवर उपलब्ध वस्तू व सेवा र. रु. ५०००/- ते ५०,०००/- पर्यंतची खरेदी पुरवठादाराकडून करता येईल. तथापि सदर वस्तू (GeM)पोर्टलवर उपलब्ध नसल्यास वा पुरवठादार स्थानिक पातळीवर पुरवठा करण्यास तयार नसल्यास अशा वस्तू निविदा न मागविता थेट जागेवर खरेदी करता येतील. परंतू अशा वस्तू व सेवांची एकूण खरेदी त्या आर्थिक वर्षात रु. ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.<br>३) खरेदी किंमत रु. ५०,०००/- पेक्षा जास्त व ३ लाखापर्यंत असल्यास (GeM) पोर्टलद्वारे निम्नतम (एल-१) पुरवठादाराकडून स्पर्धात्मक निविदेशिवाय खरेदी करण्यास मुभा राहील. मात्र अशा वस्तू व सेवांची एकूण खरेदी त्या आर्थिक वर्षात रु. ३.०० लाखापेक्षा जास्त नसावी.<br>४) रु. ३ लाख व त्यावरील खरेदी पोर्टलरवरील पुरवठादारांकउून स्पर्धात्मक ऑनलाईन विविदेद्वारे किंवा रिव्हर्स ऑकशन पध्दतीने करण्यात यावी.<br>५) दरपत्रक सादर करणाऱ्या निविदाकारांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा.<br><br>महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १२५ व १२६ तसेच महाराषष्ट्र शासन - ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक 07 ऑक्टोबर 2017 -<br>१) जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील बांधकामे/विकास योजना यांच्याशी संबंधित प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आणि निविदा/कंत्राट स्विकारण्याच्या अधिकारात वाढ<br>२) विकास योजनेला तांत्रिक मान्यता देण्यासाठी जि.प. सभेला शिफारस करण्याकरिता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तांत्रिक समितीची रचना.<br>३) 30 लक्ष ते 50 लक्ष - मा. स्थायी समिती सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक<br>४) 50 लक्ष वरील रकमेस मा जि. प. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक . | |
| PP३ | | प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे उदा. विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी | लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक | लागू नाही | |
| | | | कार्यालयीन कागदपत्रे | सर्व विभागाकडून संबंधित विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने आवश्यक साहित्यांची मागणीपत्र घेणे. | |
| PP४ | | प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परीक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प , विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी | | १. सर्व विभागांकडून प्राप्त मागणीपत्रांची छाननी करणे.<br>३. साहित्याची संख्या निश्चित करणे<br>४. खरेदी समितीच्या सभेसाठी दिनांक व वेळ निश्चित करणे<br>६. साहित्याची संख्या निश्चित करुन GEM पोर्टलवर BID टाकणे<br>८. १५ दिवसानंतर BID खोलणे<br>९. किती पुरवठादार यांनी सहभाग घेता याची खात्री करणे<br>१०. पुरवठादार यांची कागदपत्रांची पडताळणी करणे<br>११. फायनासील ओपन करणे<br>१२. लघुत्तम दर निश्चित करणे<br>१३. पुरवठा आदेश देणे<br>१४. देयक अदा करणे | |

| पुणे जिल्हा परिषद- Process Mapping -Template | | | | |
|---|---|---|---|---|
| विभागाचे नाव | | सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पुणे | | |
| अ. क्र. | प्रक्रिया स्थिती (Steages of Process Mapping) | बाब | माहिती | शेरा |
| PP५ | | प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पंस/ ग्रापं/ जि. प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये तसेच शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे / महामंडळे / मनपा/ नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त करावयाची माहिती, मान्यता, शिफारस | PP३ मध्ये नमूद बाबींची पूर्तता | |
| PP६ | | तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ/क.प्र.अ/ पर्यवेक्षीय अधिकारी ) | कनिष्ठ लेखाधिकारी | |
| PP७ | | प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी | १) संबंधित विभागांकडून खातेप्रमुखांचे स्वाक्षरीने मागणीपत्र प्राप्त झालेबाबतची पडताळणी<br>2) प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता प्राप्त<br>3) BID मध्ये सहभागी झालेल्या पुरवठादारांच्या कागदपत्रांची पडताळणी (कायदेशीर व आर्थिक बाबींशी निगडीत कागदपत्रे)<br>4) पुरवठा आदेशानुसार पुरवठा करणेत आलेल्या साहित्याची संख्या व गुणवत्ता तपासून घेणे. | |
| PA१ | प्रक्रिया मंजुरी (process approval ) | मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख /इतर ) | उप.मुख्य कार्यकारी अधिकारी , सामान्य प्रशासन. | |
| PA२ | | यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव | विकास योजनेला तांत्रिक मान्यता देण्यासाठी जि.प. सभेला शिफारस करण्याकरिता तांत्रिक समितीची रचना-<br>१) मुख्य कार्यकारी अधिकारी - अध्यक्ष<br>२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी - सदस्य<br>३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी - सदस्य<br>४) योजना राबविणाऱ्या विभागाचे खातेप्रमुख - सदस्य सचिव<br>५) संबंधित विषयातील तज्ञ निमंत्रित व्यक्ती- सदस्य<br>संगणक व संगणकीय साहित्य खरेदीसाठी NIC पुणे यांचेकडील जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी यांचा तज्ञ व्यक्ती म्हणून सदर समितीमध्ये निमंत्रित सदस्य म्हणून समावेश करणेत आला आहे. | |
| PA३ | | Endorsement (समर्थन ) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ /अति मुकाअ/ संबंधित खातेप्रमुख) | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी | |
| PM१ | प्रक्रिया त्रुटीशोध (process | मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी | नियोजन केल्यास वेळखाऊ प्रक्रीया टाळता येते. | |
| PI१ | प्रक्रिया सुधारणा (process improvization ) | अचुकता वेळेची बचत , मनुष्यबळ कार्यक्षम वापर , पारदर्शकता याकरिता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोग्या उपप्रक्रिया /बाबी | प्रत्येक विभागाने संबंधित विभागातील उपलब्ध संगणक आणि संगणकीय साहित्याची कर्मचारी निहाय यादी ठेवावी. | |
| PI२ | | तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम | नियम व वापरण्यात येत असलेल्या संगणकीय अज्ञावलीमध्ये होणारे बदल विचारांत घेता प्रशिक्षण घेण्यांत यावे. | |
| PI३ | | मुळ संकल्पना, उद्देश , लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करायच्या बाबी | स्पॉट खरेदी बाबत असणारी मर्यादा रक्कम रुपये. ५,०००/- ऐवजी ती रक्कम रुपये. १०,००० करण्यांत यावी. | |